।। श्री सद्गुरु प्रसन्न।।

ज्ञानामृतं भोजनम्।

# पाझर अमृताचा


नोंदणी क्रमांक : MAHMAR/2004/14372

वर्ष ९ वे अंक ४ था मार्गशीष - पौष शके १९३४ १४ डिसेंबर २०१२ ते १० फेब्रुवारी २०१३

**प्रकाशक व मुद्रक:**

**श्री प्रदीप कुलकर्णी**

**मालक :**

**श्रीदत्त प्रकाशन,**

श्री स.स. दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिर

{नोंदणी क्रमांक : E-17128 (M)}

संपर्क : ९८२०५४९४१५

**प्रकाशनस्थळ :**

**श्रीदत्त प्रकाशन,**

श्री स.स. दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिर,

डी-७, दर्शन सोसायटी, प्लॉट नं. २,

गोराई, बोरीवली (प) मुंबई ९२

**मुद्रणस्थळ :**

**सुदर्शन प्रिंटिंग प्रेस**

१०, वडाळा, उद्योग भवन, वडाळा, मुं - ३१.

संपादिका : **सौ. नीता कुलकर्णी**

संपादन सहाय्य : **सौ. प्रतिभा गोखले**

**सौ. शामला आपटे**


## अंतरंग


भक्तगाथा ०३

गोजिरवाणी ०५

- सौ. नीता कुलकर्णी

अहो ऐकलतं का? ०७

- सौ. प्रांजली

रुचि रुचि भोजन ०८

तरुणाई ०९

- आरती ढोरमले

शब्द तेचि छेडिता १०

- मधुरा

गुंजारव ११

- अपर्णा

भागिरथीच्या काठावर... १२

उत्सव विशेष

# भक्तगाथा...

एके दिवशी काशीनाथपंत लेले यांच्या घरी नित्याप्रमाणे बलभीम बोवा भिक्षेकरिता आले असता, त्यांस काशीनाथपंतांनी आपल्या जवळ बसलेल्या गणपतराव उर्फ गंपू रामचंद्र तांबे नावाच्या मुलास काही तरी दोन शब्द सांगून त्यांचे मन अभ्यासाकडे वळवावे अशी बोवास विनंती केली, गणपतराव तांबे यांचे वय सुमारे २० वर्षाचे होते व सुप्रसिद्ध कवी भास्कर रामचंद्र तांबे व गोपाळराव रामचंद्र तांबे बी.ए.एल.एल.बी. रेव्हिन्यू कमिशनर मुक्कामी इंदूर यांचे धाकटे बंधू होते. गणपतराव हे मॅट्रिक होऊन होळकर कॉलेजमध्ये विद्याभ्यास करीत होते. तेथे ते नारुच्या उपद्रवाने आजारी झाल्याने त्यांचा अभ्यास बंद पडला. त्यावेळी इंदुरास देवासचे छोटेपातीचे महाराज श्रीमंत मल्हारराव बाबासाहेब पवार यांचे गुरु श्री शीलनाथ महाराज आले होते. या महाराजांकडे गणपतराव आजारातून उठल्यावर वारंवार जात असत. शीलनाथ महाराज हे प्रसिद्ध योगी होऊन गेले. श्रीमंत मल्हारराव पवार यांची त्यांच्यावर एकनिष्ठ भक्ति होती. परमार्थाचा नाद लहानपणापासून असल्यामुळे गणपतरावाचे चित्त अभ्यासावरून उडाले. त्यांचे वडील बंधु गोपाळराव यांची फार इच्छा होती की गणपतरावांनी नेटाने अभ्यास करून आपल्याप्रमाणे विद्वान होऊन आपली गृहस्थिती सुधारावी. गोपाळरावांचा अभ्यासाचा तगादा असल्याने गणपतराव पुस्तके घेऊन अभ्यासाकरिता लेले मास्तरांच्या घरी जातो अशी थाप देऊन, लेले यांजकडे पुस्तके एका कोनाड्यात ठेवून, लंगोटे कसून घरातील आखाड्यात थोडी बहुत कसरत करून तेथेच श्रीमारूतीचे समोर बसून भजन गात व सायंकाळ झाली की पुस्तके घेऊन परत येत. अभ्यासात त्यांचे चित्त लागेना हे पाहून काशीनाथपंत लेले यांनी बोवास विनंती केली की गणपतरावांचे चित्त जेणेकरून पुनः अभ्यासाकडे लागेल असे करावे. त्या दिवसापासून गणपतरावांचे व बोवांचे बोलणे चालणे होऊ लागले व त्यामुळे गणपतरावांची बोवांवर भक्ति बसली व त्यांनी बोवांकडून अनुग्रह घेण्याचा हट्ट धरला. परंतु बोवांनी निक्षून सांगितले की, ''मी अनुग्रह देणार नाही आणि तुमचा जर परमार्थात शिरण्याचा दृढ निश्चय असेल तर इंदुरास माझे सद्‌गुरू श्रीलक्ष्मणमहाराज आहेत त्यास तुम्ही शरण जाऊन त्यांचा अनुग्रह घ्यावा, त्यांच्या आज्ञेने तुमच्या मनातील शंका आम्ही दूर करण्याचा प्रयत्न करू. आज तुमची भावना माझे विषयी उत्कट आहे. पण उद्या ती कमी झाल्यास तुमचे नुकसान होईल.'' बोवांचे हे म्हणणे गणपतराव यास पटेना व बोवांपासून अनुग्रह



घेण्याचा त्यांचा निश्चयही ढळेना. ही गोष्ट घरी समजल्यावर घरातही मोठे तुफान माजले. परंतु गणपतराव यांनी आपला हट्ट न सोडता शेवटी बोवांकडून अनुग्रह घेतला व तेव्हापासून उत्तरोत्तर त्यांची वृत्ति स्थिर होऊन बोवांच्या ठिकाणी त्यांचा भाव अधिकाधिकच बसला. हे पाहून घरातील मंडळीस फार आश्चर्य वाटले. इतक्या थोड्या अवकाशात मुलगा नादी लागला. तेव्हा बोवांजवळ काही तरी चेटूक असले पाहिजे, असा त्यांचा ग्रह झाला. बोवा सांगतात तरी काय हे आपण प्रत्यक्ष पहावे नाही तर मुलगा विनाकारण 'चंगी भंगी' होणार असे मनात आणून गणपतरावांच्या मातोश्री व त्यांचा भाचा रामराव डोंगरे यांचा मुलगा व आणखी दोघे तिघे लेले यांचे घरी श्रवणास दररोज येऊ लागली. चमत्कार असा झाला की, त्या सर्व जणांस बोवांचे बोलणे, चालणे व उपदेश पर वचने फार आवडू लागली. गणपतरावांच्या मातोश्री ताईसाहेब यांची बोवांच्या साधुत्वाबद्दल खात्री झाली व काही दिवसानंतर त्यांनी बोवांचा अनुग्रह घेतला. मुले तर इतकी तल्लीन होत असत की त्यास श्रवणात समाधी सुखाचा अनुभव येऊ लागला, असे श्रीबलभीमबोवांच्या भाषणात माधुर्य होते. ही मुले नंतर प्रौढ व विद्वान होऊन लष्करात आपल्या वडिलांजवळ असत. त्यांनी व्यावहारिक विद्या संपादन करून व्यवहार व्यवस्थित चालविला. बलभीमबोवांची मूर्ती त्यांच्या मनःपटलावर साक्षात् उभी राहून त्यांना प्रेमाश्रु येत असत.

श्रीबलभीमबोवा यांचे पहिले शिष्य गणपतराव तांबे! बोवांची अत्युत्कट साधु वृत्ति पाहून लेले यांच्या घरातील मंडळीस अनुग्रह घ्यावासा वाटला. बोवांजवळून त्यांनी मोठ्या आग्रहाने अनुग्रह घेतला. काशीनाथपंतांचे मनात वास्तविक पहिल्या भेटीतच बोवांविषयी निस्सीम प्रेम उत्पन्न झाले होते व वारंवार बोवांची संगति घडल्यामुळे ते अधिकाधिक होत गेले. त्यांनी विधियुक्त अनुग्रह मात्र घेतला नव्हता. तो योग मात्र असा आला. धारेस असताना बोवांनी साडे येथील जमीन ज्या सावकराकडे गहाण टाकली होती, त्यास बोवांनी असे प्रेमळ पत्र लिहिले की, ते पोहोचताच त्याने बोवांना आग्रहाने साड्यास बोलाविले. बोवांनी जाण्याची इच्छा काशीनाथपंत यांना बोलून दाखविल्यानंतर त्यांनी नाईलाजाने रुकार दिला व गावी जाण्याच्या अगोदर एक उत्कृष्ट मेजवानी दिली. भोजनास सर्व मंडळी जमल्यावर भक्तमंडळींनी बोवांचे यथाविधि पूजन केले. यावेळी काशीनाथपंतांच्या मातोश्रींनी सुचविले की, 'बापू!

**पान नं. ६ वर**

# गोजिरवाणी...

**- सौ. नीता कुलकर्णी**

**आजी -** आज मी तुम्हाला बरेच दिवसांनी बिरबलाची गोष्ट सांगणार आहे.

**मुले-** सांग ना आजी! आम्हाला खूप आवडतात बिरबलाच्या गोष्टी!

**आजी -** अरे, एकदा अकबर राजाच्या दरबारात एक मूर्तीकार आला होता. त्याने अगदी हुबेहुब दिसणाऱ्या तीन बाहुल्या आणल्या होत्या. नंतर त्याने त्या बाहुल्या सर्वांना दाखविल्या व त्यातील फरक ओळखायला सांगितला.

**मुले -** काही होता का फरक त्यांच्यात?

**आजी -** नाही ना! वरकरणी तर त्या अगदीच सारख्या दिसत होत्या. कोणालाच त्यांच्यातील फरक ओळखता येईना! मग बादशहाने बिरबलास बोलावले व त्यास त्या बाहुल्या दाखविल्या.

**मुले -** मग बिरबलाने काय केले?

**आजी -** अरे, बिरबलाने आधी त्या तिन्ही बाहुल्या नीट न्याहाळल्या. नंतर त्याने एका बाहुलीस हातात धरले व तिच्या डाव्या कानात फुंकर मारली, तेव्हा त्याला हवा उजव्या कानातून बाहेर येताना जाणवली. मग त्याने उजव्या कानात फुंकल्यावर डाव्या कानातून हवा बाहेर येताना जाणवली.

**मुले -** इतर बाहुल्यांचे पण असेच झाले का?

**आजी-** अरे, ऐक ना पुढे! नंतर त्याने दुसरी बाहुली हातात घेतली व तिच्या डाव्या कानात फुंकून पाहिले, पण आता मात्र बाहुलीच्या तोंडातून हवा बाहेर येताना जाणवली. मग त्याने त्याच बाहुलीच्या उजव्या कानातही फुंकल्यावर हवा तोंडातूनच बाहेर आल्याचे जाणवले.

**मुले -** (आश्चर्याने) - हो?

**आजी -** हो! नंतर त्याने तिसऱ्या बाहुलीच्या डाव्या कानात फुंकर मारल्यावर हवा कुठूनच बाहेर आली नाही तसेच उजव्या कानात फुंकल्यावरही झाले. मग बिरबलाने त्या मूर्तीकारास तिन्ही बाहुल्यांमधील भेद सांगितला. तसेच पुढेही तो म्हणाला की आपल्यातही अशा तीन प्रकारच्या व्यक्ती असतात. पहिल्या बाहुलीप्रमाणे काहीच डोक्यात न घेणाऱ्या, दुसऱ्या बाहुलीप्रमाणे नुसती बडबड करणाऱ्या व तिसऱ्या बाहुलीप्रमाणे पोटात साठविणाऱ्या!



**मुले -** मग मूर्तीकार काय म्हणाला?

**आजी -** मूर्तीकार हे ऐकून अतिशय खूष झाला व त्याच्या बाहुल्या करण्यामागील उद्देशही बिरबलाने सांगितल्याचे त्याने सांगितले. हे ऐकून राजा अकबर बिरबलावर खूष झाला व त्यास मोठे इनाम दिले. मुलांनो तुम्हास यातून काही बोध झाला का?

**मुले -** हो आजी, गुरुमाऊली जे आम्हास सांगत असते ते बहुतेक वेळेस आम्ही पहिल्या बाहुलीप्रमाणे ऐकून सोडून देतो किंवा कधी कधी ऐकलेले फक्त दुसऱ्यांना बोलून दाखवतो, जसे दुसऱ्या बाहुलीचे होते.

**आजी -** बरोबर! खरं तर आपण तिसऱ्या बाहुलीप्रमाणे आत साठवून ठेवले पाहिजे व माऊलीच्या सांगण्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न केला पाहिजे, बरं का मुलांनो, कधी कधी मात्र आपल्याला पहिल्या व दुसऱ्या बाहुलीसारखेही वागावे लागते.

**मुले -** ते कसे?

**आजी -** काही बोल आपल्या हिताचे नसतात ते पहिल्या बाहुलीप्रमाणे नुसते ऐकून सोडून द्यावयाचे, डोक्यात ठेवायचे नाही. तर काही बोल हे बोलेपर्यंतच लक्षात ठेवायचे, थोड्या काळापुरते! जसे एखादा निरोप देणे, तर कधी कधी समोरच्या व्यक्तीसही शाब्दिक परतफेडीची गरज असते, तेव्हा डोक्यात राग न धरता, तेवढ्यापुरतेच ते लक्षात ठेवायचे! पण खरे बोल हे गुरुमाऊलीचेच असतात जे नेहमीसाठी हृदयात कोरायला हवेत!

---

**पान नं. ४ वरून**

तुमची येवढी भक्ति गुरुचरणी असताना तुम्ही अनुग्रहाचा विधि का करून घेत नाही?' आधी काशीनाथपंतांच्या मनात या गोष्टीची तळमळ होतीच व अशी सूचना मातोश्रींकडून मिळताच त्यांना अत्यंत आनंद झाला व तात्काळ तेथे तयार असलेल्या पूजा साहित्याने बोवांची पूजा मनोभावाने करून काशीनाथपंतांनी बोवांचा अनुग्रह तत्संप्रदाय अनुसार घेतला. वास्तविक पहाता काशीनाथपंत बोवांचे शिष्य त्यांच्या पहिल्या भेटीतच झाले होते. पण अनुग्रहाचा विधि राहिला होता तो अशाप्रकारे सहजासहजी घडून आला व नंतर सर्वांनी आनंदाने श्लोक म्हणत म्हणत व नामस्मरणाच्या गजरात भजन केले. दुसरे दिवशी बोवा पत्नी व मुलासह साडे येथे जाण्यास निघाले व सर्वांस मोठ्या प्रेमाने निरोप दिला. भक्तमंडळीस अत्यंत वाईट वाटले. त्यांनी बोवांकडून 'पुन्हा लवकर येईन' असे अभिवचन घेऊन बोवांस स्टेशनपर्यंत पोहोचविले. गाडी हलल्यावर मग सर्व घरी परतले.

# अहो ऐकलतं का?...

**- सौ. प्रांजली**

**स्वदेश आगमन**

''अडीच हजार रूपये द्यायचे? माऊलींनी असे कसे आम्हाला न विचारताच स्वदेशीत नाव नोंदविले? माऊलींनी काय नविन व्यापार सुरु केलाय? हे काय नविन? आम्हाला माहित आहे ही एक साखळी पद्धत आहे. छे, छे ह्या असल्या भानगडी करायला आम्हाला वेळ नाही. आमच्या मुलांना भलत्याच गोष्टीत गुंतवू नका! त्यांना करीअर करायचे आहे. ही एक शुद्ध फसवणूक असून पैसे उकळण्याचा धंदा आहे.''

एक ना अनेक प्रतिक्रिया आमच्यावर आदळत होत्या. पण एका प्रसंगाने रेश्मा हबकून गेली. ''अगं, रेश्मा, बघ ना मी आजारी झाले, घरात एकूणच खूप संकटे एका मागून एक येत आहेत. मी माऊलींचे पैसे थोडे-थोडे करून देईन.'' त्यांच्या बोलण्याचा अर्थच कळेना. मग त्याच पुढे म्हणाल्या, ''अगं, तू ते स्वदेशीचे काही तरी उत्पादने घेऊन आली होतीस ना, त्यानंतरच हे सगळं घडलं आमच्या घरात!'' खरचं कीव आली त्या जीवाची! बोध घेऊन गुरुमंदिरात राहून उत्सवाचा आनंद लुटून गेलेला साधक, यांना शिष्य तरी कसे म्हणायचं? संतांचे पैसे बुडवायचे नाहीत, त्यांचं ऋण आहे म्हणूनच आमच्यावर अशी संकटे येत आहेत, असे म्हणायचे होते त्यांना!

काय म्हणावं त्यांना? मांजरीचे दात कधीतरी तिच्या पिल्लांना लागतात का? पण आम्ही माऊलीला गुरुमाऊली म्हणून पाहतच नाही. कायम संशय! देवाचा कोप व्हावा तसा कोप झाला आणि घरावर अवकळा आली, असे म्हणून मोकळे! पण प्रत्यक्षात ती तळमळ, तो कळवळा कोणाला कळलाच नाही. स्वदेशी तर एक बहाणा होता, बोध घेऊन गेलेल्या आपल्या शिष्यांना, बाळांना जागं करायचा! सामान्य जीवांना अमूल्य अशा नरदेहाचं महत्त्व पटलेलचं नसतं. मनुष्य म्हणून जन्माला आलेले असले तरी जीवनक्रम हा एखाद्या प्राण्यासारखाच चालू असतो. आहार, विहार, निद्रा व मैथून!

सद्‌गुरुमाऊली जीवांना उद्धरण्यासाठी अवतरली. मग ती हजारोंनी बोध घेतलेल्या आपल्या बाळांना असं कसं सोडेल? भवसागरातून त्यांना वर काढण्यासाठी म्हणून ती एक साद होती, '**स्वदेशी**'!



स्वदेशीच्या माध्यमातून गुरुमाऊली आम्हाला शिष्यांकडे पाठवून आपल्या बाळांना पाहत होती. पण दुर्दैवाने ती साद, तळमळ फार कमी जणांपर्यंत पोहोचली.

सामान्य माणसांनासुद्धा परदेशातील सुख-सोयी, ऐश्वर्य व तेथील राहणीमानाचे आकर्षण व मोह असतो. परंतु त्यांना हे कळत नसते की, आपले जगणे हे परदेशातील नियम व अटी यांच्याशी बांधलेले असते. साहजिकच एकूण जगणे हे परतंत्राचेच असते.

असा जीव देहरूपी परदेशात अडकून दुःखात सुख शोधत असतो, तर गुरुमाऊली **स्वदेशात** (स्वरूपात) राहायला बोलवत असते. तेथे आपणच आपले राजे असतो व आपल्या देहात कसे बेचाळीस नोकर आहेत हे शिकविते. पण त्यासाठी मंदिरात येऊन गुरुमाऊलींच्या पुढ्यात बसून शिकावे लागते. मग गुरुमाऊली आपल्याला कसा रंकाचा राजा बनवते!

काही दिवसांनी परत त्या व्यक्तीची भेट झाली. प्रपंचात सर्व मनासारखे झाल्याने खूप आनंदी दिसत होती. जसे आजारपण आल्यावरच निरोगीपणाचे महत्त्व व आनंद समजतो. तसेच प्रपंचातही अडचणी व संकटे आल्यावरच सुखाची किंमत समजते, नाही का? म्हणूनच तर माऊली आपल्याला स्वदेशी बोलावित असते की जेथे सुख दुःखाची झळ पोहोचत नाही.

# रुचि रुचि भोजन...

संत संगे मी शिकलो जेऊ। अहं सहित नाठवे सोऽहं।।धृ।।
विवेक वरण निवृत्ति रोटी। स्वानुभव घृत वाढिले ताटी।।
शांती क्षीर ही वाढिली बरी। सप्रेम साजिरी साखर वरी।।१।।
विश्रांति घरी अभेद भांडे। मोक्ष निजामृत त्यावरी सांडे।।
अलक्ष वडा बहुत पुडा। समाधान फेणीचा खार तो गाढा।।२।।
सद्‌भाव भात नव लक्ष कढी। जव जव जेवी तव तव गोडी।।
वैराग्य पापड भजन भाजी। निष्काम लोणची वाढीली आजी।।३।।
प्राप्ति दध्योधन वाढियेले ठायी। सबाह्य तृप्ति जेविता पाही।।४।।
गुरुकृपे केशवी जेऊनी धालो। जेविता जेविता ईश्वर झालो।।५।।

# तरुणाई...

- आरती ढोरमले

**मन बुद्धिच्या पलिकडे...**

'लाईफ एक नाटक जैसे होती है।' यह सुनकर थोडा अजीब लगता था, थोडा कम सच लगता था। पर दिनबदिन जितना दुनियासे परिचय होने लगा तो यह सौ प्रतिशत सच लगने लगा। छोटे होते है तो माँ, पिताजी का इतना कवच होता है कि पता नहीं चलता की लाईफ क्या है, पर जैसे जैसे हम खुदकी उडान भरने लगते है तो पता चलता है की बडे होना कितना मुश्किल होता है।

और उसी समय हमारा सच्चा अध्यात्म चल रहा होता हैं। वह जो खडे होने का प्रयास करते है, एक लम्बी उडान भरने के लिए, तभी हमें हमारे निज गुरु के दर्शन होते है। क्योंकि मन और बुद्धि संकल्पो, विकल्पो और विकारो में फंसी होती है। और गुरु ही इन सबको जगह पर लाने के लिए आधारस्तंभ होते है, क्योंकि उन्होंने ही **'मै मन बुद्धि से परे, शुद्ध कैवल्य, अच्युत आत्मा हूँ'** यह सिखाया होता है। विचारों और संकल्पों में फँसी हुई मन, बुद्धी सिर्फ गुरुदेव के एकमात्र झलक से (विचारो में) स्वरूपाकार हो जाती है।

अगर मन, चित्त सद्‌गुरुको शरण हो तो, सगुण सद्‌गुरू सामने न होते हुए भी उनके विचारों की आभा यह कार्य कर देती है। यह शरण न होने पर भी सद्‌गुरु की आभा शिष्य के साथ होती है, परंतु मन, बुद्धि उसे स्वीकार नहीं कर पाती, क्योंकि वह संसार के दलदल में फँसी होती है। **''बुद्धि कर्मानुसारिणी।''** शुभसंकल्प धारण नही कर पाती।

परंतु अगर शिष्य पूर्ण रूपसे गुरु विचारों से अभिन्न हो, वह **'समूळ त्याला वाहिले, त्याचे होऊनी राहिले'** स्थिती पर हो, तो वह उन सब समस्याओंको द्रष्टाभावसे देखकर, काम, क्रोध, लोभ, भय, मोह इन सब विकारों में 'न अटककर समाधान ढूँढ सकता है। वह पूरा महाभारत रथ में बैठकर देखते देखते जीवन जीता है, समाधानी रहता है।



# शब्द तेचि छेडिता...

- मधुरा

दिवस असे की कोणी माझा नाही
अन् मी कोणाचा नाऽही...

आकाशाच्या छत्रीखाली भिजतो, आयुष्यावर हसणे थुंकून देतो
या हसण्याचे कारण उमगत नाही, या हसवणे म्हणवत नाही!...

प्रश्नांचे हे एकसंधसे तुकडे, त्यावर नाचे मनीचे अबलख घोडे
या घोड्याला लगाम शोधत आहे, परि मजला गवसत नाही...

मी तुसडा की मी भगवा बैरागी? मद्यपि वा मी गांजेवाला जोगी?
अस्तित्वाला हजार नावे देतो, परि नाव ठेववत नाही...

डोळ्यांमधुनी भिरभिर बघतो सगळे, निरर्थकाचे खेळ चालले न कळे!
बघता बघता पाणी दाटून येते; त्या अश्रु म्हणवत नाही...

'मम' म्हणताना आता हसतो थोडे, मिटून घेतो वस्तूस्थितीचे डोळे
या जगण्याला स्वप्नांचाही आता, मेघ पालवत नाही...

असं म्हणतात मंदिरात जाऊन आपला पूर्ण ॲप्रोच बदलून जातो. आजूबाजूला घटना त्याच घडत असतात पण आपण त्याच गोष्टीकडे नव्याने बघू लागतो. हे गाणं त्याचं क्लासिक उदाहरण आहे.

आधी हे गाणं आवडायचं नाही. असं वाटायचं कसा माणूस आहे हा? माणूसघाणा, कोरडा! तुम्हाला नाही असे वाटत? मला माहिती आहे तुमच्या पैकी काही लोकांना पटत नाही. पण बरोबरच आहे न ते! कारण तुम्ही पण हे गाणं माझ्यासारखं कधीतरी गुरुदेवांकडून ऐकलं असेल. जेव्हा गुरुदेवांकडून ऐकलं तेव्हा ते गाणं वेगळचं रूप घेऊन समोर आलं. खरं सांगायचं तर ते गाणं गुरुदेवांच्या भावातून वाचलं, आणि वाटलं, कसलं भारी गाणं आहे हे! गुरुदेव जसं आपल्याला वागायला सांगतात तसंच तर हा कवी संदीप खरे म्हणतोय!

गुरुदेव नेहमी म्हणतात की 'माझं-माझं' चं ओझं काढून ठेवा! आणि ते बाजूला

जेव्हा आपण खरंच काढतो अन् हळूहळू आपली दृष्टी आत वळवतो, तेव्हा कसं वाटत असेल हे ह्या कवितेने समोर आणलं...

आपल्याला कधी कधी प्रश्न पडतात की खरचं आपण कोण? मग आपण 'कुणाचे' 'कुणी' तरी अशी आपलीच ओळख आपल्याला करायचा क्षीण प्रयत्न करत असतो, पण मंदिरात आपण येतो, बोध घेतो मग कळतं की जे आपण आहोत त्याला कुठलंही नाव देताच येणार नाही...

पण हे आपल्याला इतकं पटकन खरंच रियलाईज होतं? सगळ्यात मोठा अडथळा कोणता असतो? अगदी बरोबर मन! मनाला थांबवणारं शस्त्र वापरायला थोडा वेळ लागतो, पण गुरुदेव सगळं सोपं करून टाकतात, 'गवसत नसलेला लगाम' अलगद हातात येतो, आणि मग खरंच गंमत होते...

मग आपल्याला पूर्वी ज्या गोष्टींची भीती वाटायची, रडू यायचं, त्या गोष्टींवर हसू येऊ लागतं. पण आपण नक्की का हसतो आहोत, हे आपण कुणालाच सांगू शकत नाही. पण आपलं हसू? ते मात्र कायम राहतं, अगदी तस्संच! आपल्याला जाणवायला लागतं की अरे! ज्या गोष्टींना आपण इतके दिवस महत्त्व दिलं, त्या किती क्षुल्लक आहेत, अगदी निरर्थकच!

**पान नं. १५ वर**

# गुंजारव...

**- अपर्णा**

मूर्ती जशी ही चैतन्याची। भान हरपते पाहताची।
मी पण होते वेगळे। होताच भेट नयनांची।।

स्थूळ सूक्ष्माहूनी वेगळा। बोधातूनी कळले।
तो म्हणजेच तू आहेस। त्यामधुनी सांगितले।

अडकतो सदा विषयात। शब्द स्पर्श रूप रस गंध।
द्रष्टा साक्षी चैतन्य पदावर रहावे। हाच लावलासे छंद।।

दृंद्वाने होतो नाश सर्वांचा। सावरते ती गुरुमाऊली।
आकाशाहुनी विराट अशी। त्यांची प्रेमळ सावली।।

**पान नं. १४ वर**



# भागिरथीच्या काठावर बसले असताना अंगावर उडालेले ज्ञानतुषार...

## सदाचार

३) परमात्मा आमुच्या बुद्धी। प्रेरीतसे चिदानंदी
तोचि आत्मा निरवधि। प्रभाती स्मरो।।३।।

**अर्थ** - परमात्मा आमच्या बुद्धीला चिदानंदातच प्रेरणा देत असतो. तोच आत्मा (आतमध्ये असणारा) आहे, जो ठसंठस भरलेला आहे. ज्याचे स्मरण आम्ही सकाळी केले पाहिजे.

**भावार्थ** - परमात्मा म्हणजेच परम आत्मा जो सागराप्रमाणे आहे, तोच आमच्या बुद्धीस प्रेरणा देत असतो. म्हणजेच आमची बुद्धी कार्यरत होण्यास परमात्म्याच्या अधिष्ठानाची गरज आहे. जसे एखादी निर्जिव वस्तू विजेच्या सहाय्याने चलायमान होते, तसेच! ही प्रेरणा चिदानंदातूनच येते. बुद्धी जी कार्यरत होताना दिसते, ती दुसरे काही नसून परमात्म्याची प्रेरणाच असते. जसे विजेचे उपकरण कार्य करताना दिसते, पण वीजप्रवाह काही दिसत नाही. फक्त देहबुद्धी जेव्हा निरदर्शनास येते तेव्हा परमात्माच्या प्रेरणेचा प्रश्न पडतो, परंतु येथे असे जाणावे की ज्या बुद्धीला परमात्म्याची प्रेरणा झेलण्यास काहीच अडथळा येत नाही किंवा जिचे मुख पूर्णपणे परमात्म्याकडे आहे, किंवा जी परमात्म्याच्या निकटच आहे, तिला ही प्रेरणा आपल्यातून सहज प्रकाशित करता येते व जिथे अडथळे अधिक तिथे हा प्रकाश तिला (बुद्धीला) पूर्णपणे दाखविता येत नाही.

तोच आत्मा (आत मधला मी) असतो, जो अवधि विरहित म्हणजेच ठसंठस भरलेला आहे, जसे सागरात पाण्याशिवाय दुसरे काहीच नाही. त्याचे स्मरण आम्ही प्रभाती म्हणजे दिवसाच्या सुरुवातीलाच केले पाहिजे. ज्यायोगे आमची बुद्धी दिवसभर त्या प्रकाशातच नांदेल.

४) अन्वय व्यतिरेकेंकडून। अवस्था तिहीं एकले ज्ञान।
जें केवळ परब्रह्म पूर्ण। तेचि मी ऐसे स्मरावे।।४।।

**अर्थ** - अन्वय व व्यतिरेकाने पिंडाच्या व ब्रह्मांडाच्या तिन्ही अवस्था पाहिल्यानंतर

एकाचेच ज्ञान उरते. जे फक्त परब्रह्मच असून पूर्णही आहे. तेच 'मी' आहे याचे स्मरण ठेवावे.

**भावार्थ -** व्यतिरेक करत असताना चारी देह हे पंचभौतिकच आहेत ते असत्, जड व दुःखरूप आहे हे जाणले जाते. नंतर देहाच्या जागृत, स्वप्न व सुषुप्ती या तिन्ही अवस्थेत एकच 'मी' आहे ही खात्री पटल्यावर अन्वयाने तोच (मी) सगळीकडे आहे हे दाखवले जाते. पिंड व ब्रह्मांडाच्या तिन्ही अवस्थेत 'मी' असतोच. खरे तर या तिन्ही अवस्थांचा तो द्रष्टा, साक्षी असतो. म्हणजेच एकच एक वस्तू पिंडाचा व ब्रह्मांडाचा नित्यानित्य विवेकाने लय केल्यावर उरते. तीन अवस्था या पंचभौतिक देहाच्या तसेच पंचभौतिक ब्रह्मांडाच्या आहेत. त्यानंतर जे राहते ते फक्त परब्रह्मच! जे पूर्ण आहे म्हणजेच छेदाचा, भेदाचा त्याला स्पर्शही झालेला नाही. ते अखंड, असीम असे आहे. तेच 'मी' आहे ह्याचे स्मरण ठेवावे.

५) हा विलास ज्ञानाज्ञानाचा। ज्ञानाज्ञानरूप दिसे साचा।
वोहट होताचि दोहींचा। ज्ञानमात्रचि उरे।।५।।

**अर्थ :** हा जो विलास आहे तो ज्ञान आणि अज्ञान दोन्हीचा असून तो ज्ञान आणि अज्ञान रूप ठसा दिसतो. या दोन्हीचा लय झाल्यावर फक्त स्वसंवेद्य स्वरूप उरते.

**भावार्थ :** सगळीकडे जो विलास दिसतो तो ज्ञान आणि अज्ञान या दोन्हीचा आहे. जसे सोन्यामध्ये तांबे मिसळूनच दागिने घडविले जातात आणि मग ते सुंदर दिसू लागतात. तसाच हा विलास म्हणजेच ज्ञान आणि अज्ञानाचा खेळ आहे. दागिने घडविल्यावरही सोन्याचे तेज दिसतच असते व दागिन्याचा आकार व रूपही दिसू लागते. तसेच हा ज्ञान आणि अज्ञानाचा ठसा दिसत असतो. शुद्ध सोने मिळविण्यासाठी त्या दागिन्यांना वितळवावे लागते. म्हणजेच शुद्ध सोने जे इतर मिश्र धातु विरहीत असते म्हणजेच पूर्णतः सोनेच असते. अगदी तसेच ज्ञान आणि अज्ञानाचा जो ठसा किंवा विलास दिसतो त्याचा लय झाल्यावर फक्त स्वसंवेद्य ज्ञानच उरते. म्हणजेच जसे दागिने मुशीत टाकल्यावर फक्त सोनेच शिल्लक राहते. त्याचा रूप व आकार नाहिसा होतो तसेच, स्वसंवेद्य स्वरूप टिकणारे, उरणारे आहे. बाकीचे सारे काळाच्या अधिन असून ते नाशिवंत आहे.



६) देह तो मलिन अत्यंत। निर्मल आत्मा सदोदित।
असंग ऐसा मी जाणत। शौच त्यातें बोलिजे।।६।।

**अर्थ :** देह हा अत्यंत मलिन आहे व आत्मा हा निर्मळ आहे. म्हणजेच मळाचा स्पर्शही नसलेला व सदा उदीत म्हणजेच निरंतर आहे. मी देहाहून निराळा आहे, हे जाणणे म्हणजेच शौच होय.

**भावार्थ :** देह हा मलिन आहे, तो पंचमहाभूतांचा आहे. त्यामुळेच अतिशय मळलेला आहे. आत्मा हा निर्मळ आहे. शुद्ध आहे. तसेच तो सदोदित म्हणजेच नेहमीच असणारा, अविनाशी आहे. शौच क्रियेमध्ये शरिरातील मलत्याग केला जातो. ज्यामुळे दिवसभरासाठी शरीर उत्साहपूर्ण व निरोगी राहते. मलत्याग हा शरीरासाठी अतिशय आवश्यक असतो, नाहीतर शरीर रोगट बनते. अगदी तसेच मी देहाहून निराळा आहे हे जाणणे, म्हणजेच उपाधी मलाचा त्याग करणे हीच शौचक्रिया होय! 'मी' ला या उपाधी मलाचा अजिबातच स्पर्श झालेला नसतो व 'मी' हा देहातीत आहे हे जाणणे हे रोजच्या शौच क्रियेइतकेच आवश्यक आहे.

---

**पान नं. ११ वरून**

रानोमाळी खस्ता खाल्लेल्या। जीवास आधार देते ती गुरुमाऊली।
किनारा लाटेचे प्रेम। अनुभवास देते ती आपुली माऊली।।

डोळे दिपवून टाकी। रूप त्यांचे काय वर्णू।
सहवासाने तर लाभतसे स्वर्ग। कुठल्या शब्दात आता सांगू।।

मौन आले आता। अजून काय सांगू।
लीला त्यांची अफाट। एकत्र सारे अनुभवू।।

कारूण्य मूर्ती अशी। प्रेमाने ओतप्रोत भरली।
वाढदिवस सोहळी। श्रीमाधुरी सजली।।

चिकटे जसा मुंगळा। गुळांच्या ढेपांना।
चिकटू दे अपर्णाला पण आता। प्रेमभरीत माधुरीनाथांना।।

# उत्सव विशेष...

## श्रीसस बलभीम महाराज पुण्यतिथी उत्सव

**भाद्रपद कृ. ९ ते ११, शके १९३४ दि. ९ ऑक्टोबर ते ११ ऑक्टोबर २०१२**

**मूळपद**

*तुम्ही कृपा केलियावरी, पात्र होईन निर्धारी।।१।।*
*आता नका धरू दुजे। मीतू पणाचे उतरा ओझे।।२।।*
*एका जनार्दनी शरण। जीवींची निजखूण त्या द्यावी।।३।।*

## श्रीसस माधुरीनाथ बोधतिथी उत्सव

**अश्विन कृ. २ ते ४ शके १९३४ ३१ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर २०१२**

**मूळपद**

*नेणती जाणती होती आणि जाती। पाईकीची ज्योती ब्रह्मरूप।।१।।*
*म्हणोनी जडले सेवेलागी मन। नव्हेचि उद्विग्न चित्त कधी।।२।।*
*एका जनार्दनी प्रेमाचे भांडार। पाईकपणे उदार शोभे जगी।।३।।*

---

**पान नं. ११ वरून**

आणि मग आतून जाणीव होते. अरे! गुरुदेव आहेत म्हणूनच आज आपण हे सगळं समजू शकलो नाहीतर काय झालं असतं? आणि हा भाव डोळ्यांशिवाय कोण व्यक्त करणार? गुरुदेवांकडे बघू लागताच डोळ्यांना अक्षरशः धारा लागतात; पण ते अश्रु असतात का? छे! मग आनंदाश्रु? नाही! ते काय असतात ते सांगणं खूप अवघड! जेव्हा डोळे भरून येतात, तेव्हा ते नुसते येत नाहीत, त्यांच्यात एक भाव दाटलेला असतो, आणि तो कुठल्याही शब्दात कसा मावेल? ते अश्रु म्हणजे नुसतं, पाणी नसतं, जोरजोरात कोसळणाऱ्या पावसासारखी त्यांच्यामध्ये ताकद असते. सगळं मळभ दूर करण्याची, सगळी धूळ झाडून काढायची. मग काय? मग...

**दिवस असे की कोणी माझा नाही, अन् मी कोणाचा नाही...**

# संपादकीय...

जस जसे वैद्यकशास्त्र प्रगति करू लागले आहे तसतसे उपचारांचे नवे मार्ग खुले होत आहेत. पण दुर्दैव मात्र असे की अनेक नविन रोगांची भरही पडत चालली आहे त्यामुळे त्या उपचारांची कमी जाणवतच असते. हे रोग फक्त देहापुरतेच मर्यादित न राहता, त्यांचा हल्ला मन, बुध्दयादिकांवरही होतो. पण यातूनच मार्ग काढायला 'तरुणाई'त मार्गदर्शन केले आहे. हे फक्त तरुणांनाच लागू आहे असे नाही. तर सर्वांनाच याचा फायदा नक्कीच होईल.

या लेखात जो संकल्प, विकल्प वर्णन केला आहे, त्याचेच प्रत्यंतर 'अहो ऐकलतं का?' वाचताना येईल. आपलेच मन संशयाच्या खाईत आपल्याला कसे पाडते ह्याचेच सुरेख वर्णन या लेखात आले आहे. परंतु या मन बुद्ध्यादीकांना वठणीवर आणण्यास 'सदाचार' चे विवरण फायद्याचे होईल. 'भक्तगाथे'तही बोधानंतर चित्तवृत्तीत कसा फरक पडतो हे समजते.

नेहमीप्रमाणेच 'गुंजारव' व 'शब्द तेच छेडिता' मधूनही माऊलीचा महिमा नव्याने ऐकायला मिळेल. असाच महिमा 'पाझर'च्या मुखाने सर्व गुरुभक्तांकडून गायला जावो हीच सद्गुरुचरणी प्रार्थना!

---

## श्रीसस दत्तात्रय महाराज पुण्यतिथी उत्सव

**कार्तिक शु. ९ ते कार्तिक कृ. १ शके १९३४**

**२२ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर २०१२**

**मूळपद**

*गुरुरायाची संगती लाभली रे। देहुबुद्धीची संगती सुटली रे।।धृ।।*
*गुरुरायाची संगती सुखमय रे। सर्व दुःखाचा आपेआप प्रलय रे।।१।।*
*गुरुरायाची संगती शांतीप्रद रे। मी तू नसे तेथे, हर्ष खेद रे।।२।।*
*गुरुरायाची संगती गोड गोड रे। नाही उपमा द्यावया दुजी जोड रे।।३।।*
*गुरुरायाची संगती भाग्ये मिळे रे। परब्रह्म सहज आकळे रे।।४।।*
*गुरुरायाचे संगती जो लागला रे। मुक्ती सुखाचा भोगी सोहळा रे।।५।।*
*दत्ता भागिरथी संगती महिमान रे। वर्णु जाता वाचेसी पडे मौन रे।।६।।*

श्री स.स. दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिर, डी-७, दर्शन सोसायटी, प्लॉट नं. २, गोराई, बोरीवली (प) मुंबई ९२

BOOK-POST

To,

## संस्थेतील
## प्रमुख सप्ताह व उत्सव

**श्री स.स. दत्तात्रय महाराज जयंती उत्सव**
पौष कृ.१ दि. २० जाने. ते २९ जाने. २०१३

**महाशिवरात्र उत्सव**
माघ कृ १३ दि. ०८मार्च ते १० मार्च २०१३

**श्री स.स. भागिरथीनाथ पुण्यतिथी उत्सव**
रंगपंचमी फाल्गुन वद्य ५
दि. २३ मार्च ते १एप्रिल २०१३

**नृसिंह जयंती उत्सव**
वैशाख शु. १४

**गुरुपौर्णिमा उत्सव**
आषाढ शु. १५

**श्री स.स. माधुरीनाथ वाढदिवस उत्सव**
श्रावण शु. १३ परम १४

**श्री स.स. दत्तात्रय महाराज पुण्यतिथी उत्सव**
कार्तिक कृ. १
दि. २१ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर २०१२

## मंदिरात केले जाणारे अन्य उपक्रम

| | |
|---|---|
| **श्री स.स. बलभीममहाराज जयंती** | - गुढीपाडवा - चैत्र शु. १ |
| **श्री स.स. लक्ष्मणमहाराज जयंती** | - वसंतपंचमी - चैत्र शु. ५ |
| **श्रीरामनवमी** | - चैत्र शु. ९ |
| **श्री स.स. नारायण महाराज जयंती व पुण्यतिथी** | - आषाढ कृ. ५ |
| **श्री स.स. भागिरथीनाथ जयंती** | - आषाढ व १५ दीप अमावस्या |
| **श्रीकृष्णजयंती** | - श्रावण कृ १ ते ८ |
| **श्री स.स निरंजनस्वामी पुण्यस्थिती** | - परिवर्तीनी एकादशी- भाद्रपद शु. ८ |
| **श्री. स.स. बलभीममहाराज पुण्यतिथी** | - इंदिरा एकादशी - भाद्रपद व. ११ |
| **नवरात्र** | - अश्विन शु. १ ते ११ |
| **श्री स.स. निरंजनस्वामी जयंती** | - कार्तिक शु. ८ |
| **श्रीदत्तजयंती** | - मार्गशीर्ष १५ |
| **दासनवमी** | - माघ व १ ते व. ९ |